# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ औरंगाबाद.

**Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone No.2336172**


No,CGRF/AZ/R/152/2008/73/ Date :-

To,
The Executive Engineer ( Administration)
O/O Superintending Engineer
O&M Rural Circle, M.S.E.D.C.L.,
Aurangabad.

Sub :- Forwarding of grievance in respect of Shri Kedar A.Joshi, Plot No.21, Gurukrupa Housing Society, Shahnurwadi, Aurangabad. (Consumer No. 490920210683).

Dear Sir

Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Shri Kedar A.Joshi, Plot No.21, Gurukrupa Housing Society, Shahnurwadi, Aurangabad.

You are requested to submit your parawise reply on the grievance within 15 days from the date of this letter. **The hearing is fixed on 02.12.2007 at 12.30 Hours**

You are also requested to be present along with the concerned in charge at the time of hearing.

Member Secretary
CGRF, (AZ) MSEDCL,
Aurangabad.

Encl: As above.

Copy to:-
**Shri Kedar A.Joshi,**
**Plot No.21, Gurukrupa Housing Society,**
**Shahnurwadi, Aurangabad.**

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/आर/१५२/२००८/७३**

| | |
|---|---|
| **तक्रार दाखल** | **दिनांक ;- १८/११/२००८** |
| **निकाल** | **दिनांक ;- १५/०१/२००९** |

**श्री केदार अच्युत जोशी,**
**२१गुरूकृपा, प्लॉट नंबर,**
**शहानुरवाडी औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.४९०४८०२१६६४ ए.जी.)**

**अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित ग्रामीण मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

**आदेश**

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/११/२००८ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०२/१२/२००८ रोजी ठेवण्यात आली.

१) अर्जदाराने मंचात दाखल केलेल्या तक्रारीनुसार त्यांनी १९९७ मध्ये गट क्रमांक १७१ आपतगांव ता. औरंगाबाद येथील त्यांच्या शेतातील विहीरीवरील पंपासाठी नवीन वीज पुरवठा देण्याकरीता महावितरण कंपनीस (वीज मंडळ) अर्ज दिला होता. दिनांक १७/०८/१९९७ रोजी त्यांना महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (सध्याची महावितरण वीज कंपनी) यांच्या संबंधीत विभागातर्फे २३२०/-रूपयाचे कोटेशन देण्यात आले ज्याचा भरणा त्यांनी केला आहे. संबंधीत वीज कार्यालयात वीज पुरवठाबाबत विचारणा केली असता त्यांना ज्येष्ठता यादीनुसार वीज पुरवठा देण्यात येईल असे सांगण्यात आले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार वीज मंडळाने ज्येष्ठता यादीप्रमाणे वीज पुरवठा न करता अनेक ग्राहकांना वीज पुरवठा केला आहे. याबाबत त्यांनी महावितरणच्या संबंधीत कार्यालयास विचारणा केली असता त्यांना दिनांक १०/०३/२००६ रोजी ५६२०/-रूपयाचे कोटेशन देण्यात आले व ही रक्कम न भरल्यास विजेची त्यांची मागणी रद्द करण्यात येईल असे संबंधीत अधिका-यातर्फे त्यांना सांगण्यात आले.दिनांक २२/०२/२००६ रोजीच्या दैनिक लोकमत मध्ये याबाबत प्रकाशीत करण्यात आलेली जाहीरात अर्जदारास दाखविण्यात आली. अर्जदाराने या जाहारीतीनुसार वरील कोटेशन भरले असल्याचे म्हटले आहे. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास ही रक्कम भरल्यानंतही वीज पुरवठा न करता दिनांक २४/०९/२००७ रोजी त्यांना ५०८०/- रूपयाचे पुन्हा एकदा कोटेशन दिले. व ही रक्कम न भरल्यास तुमची विजेची मागणी रद्द करण्याची धमकी पुन्हा त्यांना देण्यात आली. अर्जदाराने ही रक्कमसुध्दा भरली असल्याचे म्हटले आहे.अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीत त्यांनी महावितरणच्या संबंधीत कार्यालयाकडे सतत

पाठपुरावा केल्यानंतर दिनांक १५/०१/२००८ रोजी त्यांना शेती पंपासाठी वीज पुरवठा करण्यात आला पण त्याची महावितरणच्या रेकॉर्डवर नोंद ०२/०१/२००८ अशी दाखवण्यात आल्याची अर्जदाराने म्हटले आहे. अर्जदाराच्या तक्रारीनुसार त्यांनी १९९७ साली भरलेल्या कोटेशन नुसार महावितरण कंपनीतर्फे त्यांना वीज पुरवठा करणे बंधनकारक होते. महावितरण कंपनीने कोणतेही अधिकार नसतांना जाहीरात प्रसिध्द करून त्यांच्याकडुन तसेच इतर अन्य शेतक-यांकडुन वाढीव कोटेशन ची वसुल केलेली रक्कम ही नियमबाह्य असुन त्यामुळे त्यांची व अनेक ग्राहकांची फसवणुक करण्यात आली असल्याचे म्हटले आहे. महावितरण कंपनीतर्फे दिनांक २४/०९/२००७ रोजी देण्यात आलेले ५०८०/-रूपयाचे कोटेशन सुध्दा चुकीचे असल्याचे त्यांनी आपल्या तक्रारीत पुढे म्हटले आहे. अर्जदाराने महावितरणच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीकडे ही तक्रार नोंदविली होती पण त्याची कोणतीही दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात ही तक्रार दाखल केली असुन जास्तीचे वसुल करण्यात आलेली रक्कम व्याजासहीत परत करण्याबाबत तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या कृती मानकाप्रमाणे व वीज न मिळात्यामुळे झालेल्या आर्थीक नुकसानाबद्दल भरपाई देण्याबाबत आदेश देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक ०२/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी श्री अच्युत जोशी उपस्थित होते. महावितरण तर्फे नोडल अधिकारी श्री जयस्वाल, सहाय्यक अभियंता श्री घोडके तसेच सहाय्यक अभियंता श्री ए.आर.पाटील उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी अर्जदारास ज्येष्ठता यादीप्रमाणे वीज पुरवठा करण्यात आल्याचे तसेच महावितरणचे ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता यांनी दिलेल्या जाहीरातीनुसार कोटेशनची वाढीव रक्कमेची केलेली मागणी योग्य असल्याचे म्हटले आहे. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीवर अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने दिलेला निकाल मंचात दाखल केला. अर्जदार प्रतिनिधीनी त्यांनी मंचात तक्रार दाखल केल्यानंतर हा निर्णय दिला असल्यामुळे तसेच तो मुदतीनंतर दिला

असल्यामुळे मान्य करून नये अशी विनंती मंचास केली. मंचाने नोडल अधिकारी यांना जेष्ठता यादी,वाढीव कोटेशन मागण्याबाबत अधिकार/ मंजुरी देण्याबाबतचे पत्र, पुढील सुनावणीच्या वेळी मंचात दाखल करण्याचे आदेश देत पुढील सुनावणी दिनांक १२/१२/२००८ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

३) दिनांक १२/१२/२००८ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते.नोडल अधिकारी यांनी ज्येष्ठता यादीची प्रत मंचात दाखल केली. वाढीव रक्कम मागणी करण्याबाबत कोणतेही अधिकार पत्र/मंजुरी त्यांनी मंचात दाखल केली नाही. अर्जदार प्रतिनिधीने नोडल अधिकारी यांनी दाखल केलेली ज्येष्ठता यादी मान्य नसल्याचे सांगितले तसेच कोटेशनची वाढीव रक्कम मागण्याचा कोणताही अधिकार महावितरणला महाराष्ट्र वीज नियामक आयोगातर्फे देण्यात आलेला नसल्याचे सांगितले मंचाने नोडल अधिकारी यांना अर्जदारास देण्यात आलेल्या कोटेशनच्या प्रति तसेच वाढीव रक्कम मागणी करण्याबाबत योग्य तो खुलासा दाखल करण्याचे सांगत पुढील सुनावणी ०२/०१/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले

४) दिनांक ०२/०१/२००९ रोजी घेण्यात आलेल्या सुनावणीस अर्जदार प्रतिनिधी तसेच नोडल अधिकारी श्री ए. आर. पाटील व सहाय्यक अभियंता श्री घोडके उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी ज्येष्ठता यादीची प्रत मंचात दाखल केली व वाढीव कोटेशनची रक्कम मागण्याबाबत कागदपत्रे दाखल करण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती केली. तसेच अर्जदाराकडुन घेण्यात आलेली कोटेशनची अतिरीक्त रक्कम परत करण्याची तयारी दर्शविली. मंचाने नोडल अधिकारी यांची विनंती मान्य करीत दिनांक ०६/०१/२००९ रोजी घेण्यात येणा-या सुनावणीच्या वेळी वाढीव कोटेशनच्या बाबतीत खुलासा करण्याचे सांगितले.

५) दिनांक ०६/०१/२००९ रोजी अर्जदार प्रतिनिधी व नोडल अधिकारी उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी वाढीव कोटेशन बाबत मान्यता किंवा अधिकार असलेली कागदपत्रे मंचात दाखल करण्यात असमर्थता व्यक्त केली. अर्जदार

प्रतिनिधीनी नोडल अधिकारी यांनी दिनांक ०२/०१/२००९ रोजी दाखल केलेल्या जवाबावर आपला प्रति जवाब मंचात दाखल केला. नोडल अधिकारी यांनी अर्जदाराने मंचात दाखल केलेला प्रतिजवाबावर आपला जवाब दाखल करण्यात मुदत मागितली. मंचाने नोडल अधिकारी यांना दिनांक १३/०१/२००९ पर्यत आपला लेखी जवाब मंचात दाखल करण्याचे आदेश देत प्रकरण निकालासाठी ठेवले.

६) अर्जदार व महावितरणचे नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या कागदपत्रावरून असे आढळुन येते की अर्जदाराने त्यांच्या गट क्रमांक १७१ आपतगांव येथील क्षेत्रातील विहीरीवरील पंपासाठी महावितरण कंपनीकडे (महाराष्ट्र राज्य वीज मंडळ) १९९७ मध्ये अर्ज दाखल केला, त्यांना दिनांक १७/०८/१९९७ रोजी वीज मंडळातर्फे २३२०/- रूपयाचे कोटेशन देण्यात आले ज्यात सर्व्हीस कनेक्शन चार्जेस, सुरक्षा रक्कम व करारनामा इत्यादी रक्कमेचा समावेश असल्याचे आढळुन येते. शेती पंपासाठी विजेची मागणी जास्त असल्यामुळे व ती देण्यासाठी लागणारे ट्रान्सफार्मर,वीजेच्या तारांचे नेटवर्क उपलब्ध नसल्यामुळे शेती पंपासाठी वीज पुरवठा करण्यात बराच कालावधी लागत होता व त्यामुळे अर्जदार ग्राहकांची ज्येष्ठता यादी तयार करण्यात येत असल्याचे व त्याप्रमाणे शेतपंपासाठी वीज पुरवठा देण्यात येत असल्याचे दिसुन येते. दिनांक २२/०२/२००६ रोजी दैनिक लोकमत मध्ये महावितरण तर्फे जाहीर सुचना प्रकाशीत करण्यात आली होती ज्यात ज्येष्ठता यादीत असणा-या शेती पंपासाठी मागणी केलेल्या ग्राहकांना कोटेशनची वाढीव रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात आले होते तसेच ही वाढीव रक्कम न भरल्यास ग्राहकाचे नांव ज्येष्ठता यादीतुन वगळण्यात येईल असे म्हटले असल्याचे दिसुन येते. अर्जदाराने वरील जाहीरातीनुसार देण्यात आलेले ५६५०/-रूपयाचे वाढीव कोटेशन भरले आहे. या नंतर ही अर्जदारास वीज पुरवठा न देता महावितरण तर्फे त्यांना दिनांक ०३/१०/२००७ रोजी ५०८०/- रूपयाचे नवीन कोटेशन देण्यात आले ज्याचा भरणा अर्जदाराने केला असल्याचे आढळुन येते. अर्जदाराने ही रक्कम भरल्यानंतर त्यांना दिनांक १५/०१/२००८ रोजी शेती पंपासाठी वीज पुरवठा करण्यात आल्याचे

मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरून दिसुन येते. नवीन वीज कायदा २००३ अस्तीत्वात आल्यानंतर व महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिनांक २०/०१/२००५ रोजी ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल विनियम २००६ पारीत केल्यानंतर कलम ३.२ (अ) नुसार वीज वितरणकंपनीना आयोगाने मान्य केलेल्या दर सुचीप्रमाणे ग्राहकांकडुन रक्कम वसुल करता येते. सुनावणी दरम्यान अर्जदारास देण्यात आलेल्या वाढीव कोटेशन बाबत मंचाने नोडल अधिकारी यांना विचारणा केली असता वाढीव रक्कम घेण्याबाबत अधिकार/मान्यता असलेली कोणतीही कागदपत्रे ते मंचात दाखल करू शकले नाहीत. त्यामुळे महावितरण कंपनीने अर्जदाराकडुन घेतलेली अतिरिक्त रक्कम रूपये ५६५०/- ची मागणी चुकीची असल्याचे मंचाचे मत आहे. महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास दिनांक ०३/१०/२००७ रोजी पुन्हा ५०८०/- रूपयाचे याच शेतीपंपाच्या वीज मागणीसाठी कोटेशन दिले जे सर्वथा चुकीची असल्याचे आढळुन येते..

(७) नोडल अधिकारी यांनी मंचात दाखल केलेल्या ज्येष्ठता यादीचे निरिक्षण केल्यावर विविध अर्जदारांना देण्यात आलेल्या कोटेशनचा तपशील खालील प्रमाणे असल्याचे दिसुन येते.

| अ.क्र. | अर्जदाराचे नांव | तारमार्गाची लांबी | वीज भार | कोटेशनची रक्कम |
|---|---|---|---|---|
| ३३१ | विजयकुमार पाटणी | ०.२४ | ३ | ६१७०-०० |
| ३३२ | फुलसिंग काशीराम | ०.२४ | ३ | २६७०-०० |
| ३३३ | रामराव विश्वनाथ | ०.१३ | ३ | २६७०-०० |
| ३३४ | श्रीमती मंगलाबाई | ०.०६ | ३ | २६७६-०० |
| ३४४ | बाबासाहेब रामकृष्ण | ०.२४ | ३ | ५०७०-०० |
| १२७ | केदार अ.जोशी | ०.३० | ३ | २३२०-०० |

महावितरण तर्फे वरील ग्राहकांना देण्यात आलेल्या मागणी रक्कम (कोटेशन) मध्ये ३ एच.पी. शेतीपंपासाठी समान अंतर असतांना देखील वेगवेगळ्या रक्कमेची मागणी करण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. यावरून शेतीपंपासाठी वीज ग्राहकाना देण्यात येणा-या कोटेशनमध्ये सुसुत्रता नसल्याचे आढळुन येते. अर्जदाराने महावितरणच्या संबंधीत विभागात तक्रार केल्यानंतर त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्षात तक्रार दाखल केली पण आयोगाने दिलेल्या ६० दिवसाच्या मुदतीत ग्राहकाच्या तक्रारीचे निवारण करण्या ऐवजी अंतर्गत तक्रार निवारण कक्षाने याप्रकरणी एकही सुनावणी घेतली नसल्याचे दिसुन येते मंच याबाबत नाराजी व्यक्त करीत असुन यापुढे महावितरण कंपनी वीज ग्राहकाच्या तक्रारीकडे गांभीर्याने पाहील अशी अपेक्षा व्यक्त करते.

अर्जदाराने शेती पंपासाठी १९९७ मध्ये अर्ज दाखल केलेला असल्यामुळे व महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने २००५ मध्ये अधिनियम व नवीन वीज पुरवठ्याबाबत पारीत केलेली कृती मानके हे वर्षे २००५ मधील असल्यामुळे शेती पंपासाठी वीज पुरवठा करण्यात झालेल्या विलंबास कृतीमानका प्रमाणे दंड लावणे योग्य ठरणार नाही असे मंचाचे मत आहे. आयोगाची मान्यता नसतांना वाढीव कोटेशन रक्कमेची मागणी करणे, कोटेशन भरलेले असतांना देखील नवीन कोटेशन देणे याबाबत अर्जदाराने दाखल केलेली तक्रार योग्य असुन वरील त्रुटी बाबत ते नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहेत.

वरील सर्व बाबीचे निरिक्षण केल्यावर मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे

# आदेश

१) महावितरण कंपनीने अर्जदाराकडुन स्विकारलेली वाढीव कोटेशनची रक्कम रूपये ५६२०/- तसेच दिनांक २४/०९/२००७ रोजी देण्यात आलेल्या नवीन कोटेशनची रक्कम रूपये ५०८०/- व्याजासहीत तीस दिवसाच्या आंत अर्जदारास द्यावी.

२) महावितरण कंपनीने अर्जदारास देण्यात आलेल्या सेवेतील त्रुटी तसेच मानसीक त्रासापोटी रूपये ५००/- तीस दिवसात द्यावे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.

**क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/१५२/२००८/७३** **दिनांक ;-**

**प्रति,**
**श्री केदार अच्चुत जोशी,**
**२१गुरूकृपा, प्लॉट नंबर,**
**शहानुरवाडी औरंगाबाद**

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रा/१५२/२००८/७३ )

आपण दिनांक १८/११/२००८ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

**प्रत,कार्यकारी अभियंता (प्रशासन),**
**अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,**
**म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद**

**विद्युतलोकपालाचा पत्ता,**
**विद्युत लोकपाल,**
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**
**६०६-६०८, केशवा,**
**बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.**
**दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.**

**सदस्य/सचिव**
**ग्राहक गा-हाणे निवारण मंच**
**म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.**